# घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प

## ग्रामपंचायत निगवे दुमाला, तालुका करवीर , जिल्हा कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हयामध्ये करवीर तालुक्यातील , शहरापासुन 8 ते 10 कि.मी. अंतरावर असणार निगवे दुमाला हे सुंदर असं गाव...

गावापासुन काही अंतरावर असणारे शहर, प्रमुख व्यवसाय शेती आणि बारमाही पाणी असणारी पंचगंगा नदी यामुळे गावाची आर्थिक प्रगती आणि विकास झपाटयाने होत आहे.

सन 2011 च्या जनगणनेनुसार, गावातील एकुण कुटुंब संख्या 1475 इतकी व 6898 इतकी लोकसंख्या आहे. गावातील सर्व कुटुंबांकडे वैयक्तीक शौचालय असुन त्याचा वापर केला जात आहे. सार्वजनिक व संस्थात्मक स्तरावर शौचालयांची उपलब्धता असलेने गाव हागणदारी मुक्त घोषित आहे.

### घनकचरा व्यवस्थापन करणे पुर्वी गावातील स्थिती:-

5000 पेक्षा अधिक गावातील लोकसंख्या, व्यवसायिक, बाजार पेठ यामुळे गावामध्ये कचरा मोठया प्रमाणात निर्माण होत होता. निर्माण होणा-या कच-याचे ग्रामपंचायतीकडुन नियोजन नसल्याने आणि ग्रामस्थांमध्ये जनजागृती नसल्याने गावातील सार्वजनिक ठिकाणी कच-याचे ढिग साचलेले असायचे. यामुळे गावाचे विद्रुपिकरण, अस्वच्छता दिसुन येत होती. सार्वजनिक ठिकाणी आणि गटारीमध्ये साठलेल्या कच-यामुळे भटकी जणावरे, दुर्गंधी, साथींचे आजार यासारख्या समस्यांना गावातील ग्रामस्थांना तोंड द्यावे लागत होते. यासर्व बाबींचा विपरित परिणाम गावाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगती होवु लागला होता. ही परिस्थिती बदलनेसाठी ग्रामपंचायतींने घनकचरा व्यवस्थापन करणेचा निर्णय घेतला.

## घनकचरा व्यवस्थापन करणेचा निर्णय:-

गावाच्या लोकसंख्येत होणारी वाढ आणि त्याप्रमाणात घनकच-याचे वाढणारे प्रमाण, प्लास्टीक आणि सुक्या कच-याचे सार्वजनिक ठिकाणी साठलेले ढिग याचे योग्य व्यवस्थान करणेचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला. यासाठी **स्वच्छभारत मिशन ग्रामीण टप्पा 2** अंतर्गत गावामध्ये कचरा संकलन व वर्गीकरण शेड व नॅडेप बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## घनकचरा संकलन व वर्गीकरण शेड :-

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा 2 अंतर्गत आणि 15 वा वित्त आयोग निधीतुन गावामध्ये घनकचरा संकलन व वर्गीकरण शेड उभारण्यात आले आहे. या वर्गीकरण शेड मध्ये कच-याच्या प्रकारानुसार वर्गीकरण करणेसाठी वेगवेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी संकलन होणा-या कच-याचे वर्गीकरण करुन, कचरा वेगवेगळा केला जातो. या शेडच्या जवळच कुजणा-या कच-यातुन खत निर्मीती करणेसाठी नॅडेपचे बांधकाम करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी साधारण 4.75 लक्ष इतका निधी खर्च झाला आहे.

## कचरा संकलनासाठी जनजागृती मोहीम :-

ग्रामपंचायत निगवे दुमाला च्या सरपंच रुपाली अर्जुन पाटील , ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य तसेच ग्रामविकास अधिकारी संजय शिंदे यांनी गावातील सर्व कुटुंबांकडील कचरा संकलन करणेसाठी गावामध्ये जनजागृती करणेचा निर्णय घेतला यासाठी वार्ड निहाय जबाबदारीचे वाटप करणेत आले. घरगुती कचरा एकत्रिकरणासाठी सर्व कुटुंबांना डस्टबिन देणेत आले.

ग्रामपंचायतीकडे कचरा संकलनासाठी टिपर रिक्षा घेणेत आली होती. यावर स्पीकर बसवुन, गावातुन कचरा संकलनाबाबत आवाहन करणेत आले. तसेच स्वच्छतेचे जिंगल यावरुन प्रसारीत करणेत आले. सरपंच, सदस्य , कर्मचरी यांचे मार्फत व्यवसायिक व कुटुंबांना गृहभेटी देवुन, कचरा उघडयावर टाकु नये,

कचरा वर्गीकरण करावा, ग्रामपंचायतीच्या वाहनामध्ये टाकावा या बाबत गावामध्ये मोठया प्रमाणात जनजागृती केली. याचा परिणाम म्हणुन कचरा उघडयावर न टाकता कचरा संकलन वाहनात सर्व कुटुंबांतील कचरा संकलन होवु लागला.

## गावातील कचरा संकलन आणि वर्गीकरण :-

9 महिन्यापासुन दररोज टिपर रिक्षा मधुन कचरा संकलन केलेला कचरा हा कचरा संकलन केंद्रात आणुन त्याचे वर्गीकरण केले जाते. साधारण दररोज 4 डिपर रिक्षा (घंटा गाडी ) भरुन कचरा संकलित केला जातो. **कचरा वर्गीकरण करणेसाठी अवणी या संस्थेसोबत ग्रामपंचायतीने करार केला आहे.** कचरा वर्गीकरण करणा-या कर्मचा-यांना ग्रामपंचायती मार्फत मानधन दिले जात आहे.

वर्गीकरण केलेल्या कच-यातील प्लास्टीक व धातुजन्य कचरा अवनी संस्थेमार्फत प्रक्रीयेसाठी पाठविला जात आहे. तसेच कजणारा कचरा नॅडेप मध्ये खत निर्मितीसाठी वापरला जात असुन, यातुन तयार होणारे खत हे शेतक-यांना विना मोबदला दिले जात आहे.

## घनकचरा व्यवस्थापन झाले नंतर गावातील स्थिती:-

गावातील कच-याचे योग्य व्यवस्थापन होत असल्यामुळे, गावात उघडयावर गावाच्या वेशीवर कुठेही कचरा आढळुन येत नाही यामुळे गावात दृष्यमान स्वच्छता प्राप्त झाली आहे. यामुळे गावात दुर्गंधी, रोगराई, आजार व अस्वच्छतेचे प्रमाण कमी झाले आहे. कचरा वर्गीकरणाची सवय गावातील सर्वच कुटुंबांना लागली आहे. गावातील शेतक-यांना विना मोबदला खत दिल्याने पिक उत्पादन वाढणेसाठी मदत झाली आहे.

निगवे दुमाला गावातील घनकचरा व्यवस्थापन योग्य प्रकारे होत असुन, आता गावाने सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रकल्प हाती घेतला आहे.

| | |
|---|---|
|  | <br> |
| कचरा संकलन व वर्गीकरण केंद्र | खत निर्मीतीसाठी नॅडेप |
| <br> |  |
| कचरा एकत्रिकरण | कचरा वर्गीकरण |
|  |  |
| | कुटुंबांकडुन दररोज कचरा संकलन |

तरुण भारत संवाद

कोल्हापूर दिनांक जिल्हा — शनिवार, दि. १४ डिसेंबर २०२४

निगवे दुमाला (ता. करवीर) येथील ग्रामपंचायतीने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गाव कचरामुक्त करून स्वच्छतेतून समृद्धीकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यासाठी त्यांनी कचऱ्याबाबत केलेल्या विविध उपाययोजना जिल्ह्यातील इतर गावांनाही मार्गदर्शक ठरणार आहेत. तालुक्यातील अनेक गावांतील ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी गावाला भेट देऊन गाव घनकचरा व्यवस्थापनाचे रहस्य जाणून घेत आहेत. त्यामुळे निगवे दुमाला गाव इतरांसाठी रोल मॉडेल ठरणार आहे.

## घनकचरा व्यवस्थापनात निगवे दुमाला बनलेय रोल मॉडेल

निगवे दुमालाची वाटचाल स्वच्छतेकडून समृद्धीकडे

प्रतिदिन जमा होणारा कचरा (अंदाजे)
ओला कचरा - ५२० किलो
सुका कचरा - १४० किलो
कचऱ्यापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न सुमारे ३५ ते ४० हजार रुपये
कचरा गोळा करून प्रक्रियेपर्यंत येणारा वार्षिक खर्च (अंदाजे) ३ लाख ८७ हजार रुपये

सतीश पाटील